INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

वेतन व संपत्तीतील असमानता – एक अभ्यास

संशोधनकर्ती
सोनल सुभाषराव डगवार
एम.ए. (अर्थशास्त्र), डि. एड.,
जी.डी.सी. ॲण्ड ए.
नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबीड
मो. क्र. 7972690236
E-mail : sonaldagwar1989@gmail.com

मार्गदर्शक
डॉ. विजय.एच.नागरे
प्राचार्य
नारायणराव नागरे महाविद्यालय,
दुसरबीड
Senate & Management Council, Member
S.G.B.A.U., Amravati

आज जगातील अनेक देशांमध्ये तसेच भारतातही वेतन व संपत्तीतील असमानता वाढताना दिसून येते. त्यामुळे या विषयाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

आर्थिक असमानता म्हणजे समाजाच्या समुहातील उत्पन्न (income) आणि संपत्ती (wealth) यांचे असमान वितरण होणे होय. म्हणजेच सर्व लोकांना समान आर्थिक संधी, उत्पन्न किंवा संपत्ती प्राप्त होत नाही. त्यामुळे श्रीमंत व गरीब यांच्यातील अंतर वाढते.

आधुनिक समाजात आर्थिक विकास, औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरणामुळे संपत्ती निर्माण होण्याचा वेग वाढला आहे. परंतु या विकासासोबतच वेतन आणि संपत्तीतील असमानता ही गंभीर सामाजिक-आर्थिक समस्या निर्माण झाली आहे. समाजातील काही व्यक्ती किंवा वर्गाकडे मोठ्या प्रमाणात संपत्ती व उत्पन्न जमा होते, तर मोठा वर्ग कमी वेतनावर किंवा अल्प उत्पन्नावर जीवन जगतो. या परिस्थितीमुळे समाजात आर्थिक, सामाजिक व राजकीय असंतुलन निर्माण होते.

(1) संपत्तीतील असमानता

संपत्तीतील असमानता म्हणजे समाजातील संपत्ती (जमीन, पैसा, उद्योग, मालमत्ता) काही लोकांच्या हातात जास्त प्रमाणात एकवटणे होय. संपत्तीमध्ये जमीन, उद्योग, गुंतवणूक, सोने, घरे, शेअर्स इत्यादींचा समावेश होतो. जगभरातील अहवालांनुसार, सर्वात श्रीमंत लोकांकडे मोठ्या प्रमाणात संपत्ती जमा होते. उदाहरणार्थ, जगातील सर्वात श्रीमंत 10 टक्के लोकांकडे जागतिक संपत्तीपैकी सुमारे 75 टक्के हिस्सा आहे, तर तळाच्या 50 टक्के लोकांकडे केवळ 2 टक्के संपत्ती आहे.

भारतामध्येही अशीच परिस्थिती दिसून येते. देशातील सर्वात श्रीमंत 1 टक्के लोकांकडे सुमारे 40 टक्के संपत्ती आहे, तर मोठ्या लोकसंख्येकडे अत्यल्प संपत्ती आहे. यामुळे आर्थिक विषमता अधिक तीव्र होते.

(2) वेतनातील असमानता

वेतनातील असमानता म्हणजे समान किंवा भिन्न काम करणाऱ्या लोकांमध्ये मिळणाऱ्या वेतनात मोठा फरक असणे. उद्योग, कौशल्य, शिक्षण, लिंग, जात, प्रदेश आणि आर्थिक स्थिती यांसारख्या घटकांमुळे वेतनात फरक पडतो. उदाहरणार्थ, एखाद्या मोठ्या कंपनीतील उच्च पदावरील व्यवस्थापकाला लाखो रुपये वेतन मिळते, तर त्याच कंपनीतील सामान्य कामगाराला अत्यल्प वेतन मिळते. आर्थिक उदारीकरणानंतर भारतात वरिष्ठ व्यवस्थापक आणि सामान्य कामगार यांच्यातील वेतनातील अंतर मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. वेतनातील असमानता केवळ व्यक्तीगत स्तरावरच नव्हे तर विविध क्षेत्रांमध्येही दिसते. उदाहरणार्थ – सरकारी व खाजगी क्षेत्र, ग्रामीण व शहरी भाग, संघटित व असंघटित क्षेत्र. अशाप्रकारे भारतामध्ये समानतेची प्रमुख वैशिष्ट्ये दिसून येतात.

(3) भारतातील वेतन व संपत्तीतील असमानता

भारत हा वेगाने विकसित होणारा देश असला तरी आर्थिक असमानता ही गंभीर समस्या आहे. विविध अहवालांनुसार भारतातील उत्पन्न आणि संपत्तीचे वितरण अत्यंत असमान आहे. अलीकडील अहवालानुसार देशातील वरच्या 10 टक्के लोकांकडे राष्ट्रीय उत्पन्नाचा सुमारे 58 टक्के हिस्सा आहे, तर तळाच्या 50 टक्के लोकांना केवळ 15 टक्के उत्पन्न मिळते. तसेच भारतातील सर्वात श्रीमंत वर्गाकडे देशाच्या एकूण संपत्तीचा मोठा भाग जमा होत आहे. यामुळे श्रीमंत-गरीब दरी अधिक वाढत आहे.

भारतामध्ये असमानतेची काही विशेष वैशिष्ट्ये दिसून येतात -
सामाजिक घटक जसे जात व लिंग, ग्रामीण व शहरी उत्पन्नातील फरक, संघटित व असंघटित क्षेत्रातील वेतनातील अंतर, शिक्षण व कौशल्यातील फरक.

(4) वेतन व संपत्तीतील असमानतेची कारणे

4.1. शिक्षणातील असमानता

शिक्षण हे उत्पन्न वाढविण्याचे महत्त्वाचे साधन आहे. परंतु समाजातील सर्व लोकांना दर्जेदार शिक्षण मिळत नाही. उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्तींना जास्त वेतन मिळते, तर कमी शिक्षित लोकांना कमी वेतन मिळते.

4.2. कौशल्यातील फरक

उच्च कौशल्य असलेल्या व्यक्तींना उद्योग क्षेत्रात जास्त वेतन मिळते. तांत्रिक कौशल्य, संगणक ज्ञान, व्यवस्थापन कौशल्य यामुळे वेतन वाढते.

4.3. तंत्रज्ञान व यांत्रिकीकरण

औद्योगिक विकासामुळे अनेक ठिकाणी मशिन व स्वयंचलित प्रणालींचा वापर वाढला आहे. यामुळे कमी कौशल्य असलेल्या कामगारांची मागणी कमी होते आणि बेरोजगारी वाढते.

4.4. जागतिकीकरण

जागतिकीकरणामुळे उच्च कौशल्य असलेल्या लोकांना जागतिक स्तरावर संधी मिळतात, परंतु कमी कौशल्य असलेल्या कामगारांना कमी वेतनावर काम करावे लागते.

4.5. सामाजिक घटक

जात, लिंग, प्रदेश, वर्ग इत्यादी घटकांमुळेही उत्पन्नातील असमानता निर्माण होते. काही समाजघटकांना ऐतिहासिकदृष्ट्या कमी संधी मिळाल्या आहेत.

4.6. कर प्रणाली

कर प्रणाली प्रभावी नसल्यास श्रीमंत लोकांवर कर कमी पडतो आणि गरीब वर्गावर अप्रत्यक्ष करांचा भार वाढतो.

(5) वेतन व संपत्तीतील असमानतेचे परिणाम

5.1. गरीबी वाढणे

असमानतेमुळे समाजातील गरीब वर्ग अधिक गरीब बनतो आणि त्यांना मूलभूत गरजा पूर्ण करणे कठीण होते.

5.2. सामाजिक असंतोष

आर्थिक विषमता वाढल्यास समाजात असंतोष, संघर्ष आणि अस्थिरता निर्माण होऊ शकते.

5.3. आर्थिक विकासावर परिणाम

अत्यंत असमानता असल्यास मोठ्या लोकसंख्येकडे क्रयशक्ती कमी राहते. यामुळे व्यवसायातील मागणी कमी होते.

5.4. शिक्षण व आरोग्यावर परिणाम

गरीब वर्गाला चांगले शिक्षण आणि आरोग्य सुविधा मिळत नाहीत, त्यामुळे सामाजिक प्रगती थांबते.

5.5. लोकशाहीवर परिणाम

संपत्ती व सत्ता काही लोकांच्या हातात केंद्रीत झाल्यास राजकीय प्रभावही त्यांच्याकडे जास्त राहतो.

5.6. असमानता मोजण्याचे मापदंड

आर्थिक असमानता मोजण्यासाठी काही मापदंड व उपाययोजना वापरल्या जातात.

1) गिनी गुणांक (Gini Coefficient)

गिनी गुणांक हा उत्पन्न वितरण मोजण्यासाठी वापरला जाणारा महत्त्वाचा निर्देशांक आहे. याची किंमत 0 ते 1 दरम्यान असते. 0 म्हणजे पूर्ण समानता आणि 1 म्हणजे पूर्ण असमानता.

2) पाम अनुपात (Palma Ratio)

हा निर्देशांक समाजातील सर्वात श्रीमंत 10 टक्के आणि सर्वात गरीब 40 टक्के यांच्यातील उत्पन्नाचे प्रमाण दर्शवतो.

3) लोरेंझ वक्र (Lorenz Curve)

हा वक्र समाजातील उत्पन्नाचे वितरण दर्शवतो.

7. असमानता कमी करण्यासाठी उपाय

1) दर्जेदार शिक्षणाचा प्रसार

सर्वांना समान व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले तर रोजगाराच्या संधी वाढतील.

2) कौशल्य विकास

कौशल्य विकास कार्यक्रमांमुळे रोजगार संधी वाढू शकतात.

3) प्रगतिशील कर प्रणाली

श्रीमंत लोकांवर जास्त कर आणि गरीब वर्गासाठी कर सवलती देणे आवश्यक आहे.

4) सामाजिक सुरक्षा योजना

सरकारने गरीबांसाठी आरोग्य, शिक्षण, अन्न व रोजगार हमी योजनांची अंमलबजावणी करावी.

5) ग्रामीण विकास

ग्रामीण भागात उद्योग व रोजगार निर्मिती केल्यास ग्रामीण-शहरी दरी कमी होईल.

6) महिला सशक्तीकरण

महिलांना शिक्षण व रोजगार संधी दिल्यास आर्थिक समानता वाढेल.

निष्कर्ष :

वेतन व संपत्तीतील असमानता ही आधुनिक समाजातील एक गंभीर समस्या आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत काही लोकांना जास्त लाभ मिळतो, तर मोठा वर्ग मागे राहतो. त्यामुळे श्रीमंत आणि गरीब यांच्यातील अंतर वाढते. भारतासारख्या विकसनशील देशात ही समस्या अधिक तीव्र आहे. शिक्षण, कौशल्य, सामाजिक घटक आणि आर्थिक धोरणे यांमुळे असमानता वाढते. त्यामुळे सरकारने समतोल आर्थिक धोरणे, सामाजिक सुरक्षा योजना आणि दर्जेदार शिक्षणाची व्यवस्था करणे आवश्यक आहे. समाजातील सर्व लोकांना समान संधी मिळाल्यासच खरा आर्थिक विकास साध्य होईल. त्यामुळे वेतन व संपत्तीतील असमानता कमी करणे हे समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

संदर्भ (References) :

1. Income Inequality Basics – Fincash.
2. Cambridge Dictionary
3. Wikipedia
4. Economic Inequality Definition – Cambridge Dictionary.
5. Income Inequality in India – Wikipedia.
6. Drishti IAS.
7. World Inequality Report – आर्थिक असमानता संबंधी माहिती.
8. Jansatta Article – Wage inequality in India.
9. appxcontent.kaxa.in

10. Jansatta
11. Economic Inequality Notes – Economic inequality definition.